महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन,वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वेपुर-११२५/प्र.क्र.२१/सेवा-९ दि. १९/१२/२०२५

**विषय:-** स्वीय सहायक या संवर्गास निवडश्रेणी लघुलेखकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वेपुर-११२५/प्र.क्र.२१/सेवा-९, दि. १९/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२१९१६४७०८५३०५असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 23-12-2025 13:02:41

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**स्वीय सहायक या संवर्गांस निवडश्रेणी लघुलेखकांप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : वेपुर -११२५/प्र.क्र.२१/सेवा-९**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- १९ डिसेंबर, २०२५

**संदर्भ :-**

१) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : वेपुर -११२१/प्र.क्र.४/सेवा-९, दि.१३ फेब्रुवारी, २०२३
२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : वेपुर -११२५/प्र.क्र.१/सेवा-९, दि.०२ जून, २०२५
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय : क्रमांक-एसआरव्ही-१०८९/प्र.क्र.१५/८९/१२, दि.१६.१०.१९९०.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय : क्रमांक-एसआरव्ही-१७९५/ प्र.क्र.४/९५/१२, दि.१८.१२.१९९५.

**प्रस्तावना:-**

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये १०४ संवर्गांच्या वेतनश्रेणी सुधारित करण्यात आलेल्या आहेत, सदर १०४ संवर्गांमध्ये लघुलेखक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक, उच्चश्रेणी लघुलेखक, निवडश्रेणी लघुलेखक, वरिष्ठ स्वीय सहायक या संवर्गाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्यात आली आहे.

तथापि, सदर लघुलेखक संवर्गामध्ये स्वीय सहायक पदाचा समावेश नसल्यामुळे सातव्या वेतन आयोगामधील वेतनत्रुटींचे निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ (खुल्लर समिती) कडे कृषि व पदुम विभागाने त्यांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ येथील स्वीय सहायक या पदास तसेच गृह विभागाच्या अधिपत्याखालील पोलीस महासंचालनालयामधील स्वीय सहायक पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यासंदर्भात वेतन समानीकरण समितीच्या (चौथा वेतन आयोग) अहवालातील परिच्छेद ३.२९ नुसार राज्यातील लघुलेखक संवर्गाचे विश्लेषण केले आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वीय सहायक संवर्गाचे पद निर्माण केल्यास सदर पदास मंत्रालयातील निवडश्रेणी लघुलेखकाची वेतनश्रेणी देण्यात यावी. प्रस्तुत संवर्गाला चौथ्या वेतन आयोगापासून सातव्या वेतन आयोगापर्यंत मंत्रालयीन लघुलखेक निवडश्रेणी संवर्गाची समकक्ष वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तसेच वित्त विभागाच्या दि.१३.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवडश्रेणी लघुलेखक संवर्गाला वेतनश्रेणी एस-१६ : ४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ : ४७६००-१५११०० अशी लागू करण्यात आली आहे. यास्तव महाराष्ट्र

पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ व पोलीस महासंचालनालयामधील स्वीय सहायक या संवर्गाला एस-१६ : ४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ : ४७६००-१५११०० वेतनश्रेणी मंजूर करण्याची शिफारस खुल्लर समितीने केली होती. सदर शिफारशीनुसार वित्त विभागाच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर दोन्ही कार्यालयातल स्वीय सहायक पदाची वेतनश्रेणी सुधारित करण्यात आली आहे.

स्वीय सहायक हा संवर्ग सर्व शासकीय कार्यालयांमध्ये संवर्गाशी समकक्ष संवर्ग असल्यामुळे सदर शासन निर्णयान्वये एकाच शासकीय कार्यालयातील स्वीय सहायक संवर्गांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय एकाच विभागापुरता न घेता सर्वसमावेश एकच निर्णय घेणे आवश्यक आहे.

यास्तव वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ (खुल्लर समिती) ने उपरोक्त नमूद कार्यालयातील स्वीय सहायक या संवर्गाला एस-१७ : ४७६००-१५११०० ही सुधारित केलेली वेतनश्रेणी सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील स्वीय सहायक पदास लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u>**

वेतन समानीकरण समितीच्या (चौथा वेतन आयोग) अहवालातील परिच्छेद क्र.३.२१ नुसार सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.३ व ४ येथील शासन निर्णयान्वये क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वीय सहायक संवर्गांचे पद निर्माण करण्यात येऊन त्यास मंत्रालयीन निवडश्रेणी लघुलेखकांची वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. तसेच वेतनत्रुटी निवारण समिती २०२४ (खुल्लर समिती) च्या शिफारशीनुसार वित्त विभागाच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ व पोलीस महासंचालनालय कार्यालयातील स्वीय सहायक या संवर्गाला एस-१६ : ४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ : ४७६००-१५११०० वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१८.१२.१९९५ नुसार मंजूर करण्यात आलेल्या सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांमधील स्वीय सहायक या संवर्गाला एस-१६ : ४४९००-१४२४०० ऐवजी एस-१७ : ४७६००-१५११०० अशी वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०२.०६.२०२५ मध्ये नमूद केलेल्या तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५१२१९१६४७०८५३०५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MUGDHA NITIN DHURI

Digitally signed by MUGDHA NITIN DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Finance Dept, 2.5.4.20=CF57B0402DF957A7D20B051925B771CB1D70227A5D6A66673B7656596A962B41, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43B82982D7CE8CB63F33F9D9AE085C7E452884CA6ED53708069BD26F9BE61D71, cn=MUGDHA NITIN DHURI
Date: 2025.12.19 16:49:07 +05'30'

**( मुग्धा नि. धुरी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई |

| | |
|---|---|
| मा. मुख्यमंत्री यांचे सचिव<br>मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>विधानसभा/विधानपरिषद विरोधी पक्ष नेता<br>सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.<br># प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.<br>#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.<br># सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.<br>#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br># आयुक्त राज्य माहिती आयोग, (सर्व)<br># सचिव राज्य निवडणूक आयोग, मुंबई.<br># प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/औंरगाबाद.<br>राज्य महिला आयोग, वरळी, मुंबई.<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवास, पुणे | सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद.<br>मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका<br>कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी / देहू रोड/ देवळाली/ अहमदनगर.<br>कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर<br>कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी<br>कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला<br>कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.<br>कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, नागपूर.<br>कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.<br>कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्रऔरंगाबाद<br>कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती<br>कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई |